राज्यातील चारही कृषि विद्यापीठे व संलग्न संस्थामधील कर्मचा-यांच्या भविष्यनिर्वाह निधी वरील सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील व्याज प्रदानाची रक्कम समायोजित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक : कृषिवि-३७१९/प्र. क्र.४३/७-अे,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २९ मार्च, २०१९.

वाचा :- १) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक - अेजीयु-२६९०/प्र.क्र.३९/१८-अे, दिनांक २९/०२/१९९२

प्रस्तावना :-

शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक -अेजीयु -२६९०/प्र.क्र.३९/१८-अे, दिनांक २९/०२/१९९२ नुसान विद्यापीठांतर्गत असलेल्या कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम शासनाकडे सुपूर्द करण्यचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार राज्यातील चारही कृषि विद्यापीठे व संलग्न संस्थामधील अधिकारी / कर्मचारी यांच्या दिनांक ०१.०४.२०१८ ते ३१.०३.२०१९ या कालावधीत जमा होणा-या रक्कमेवरील व्याज प्रदानासाठी सन २०१८-१९ च्या सुधारीत अंदाजपत्रकात रुपये १०,१५,१३,०००/- (रुपये दहा कोटी पंधरा लाख तेरा हजार फक्त) इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यांत आली आहे. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

राज्यातील कृषि विद्यापीठे व संलग्न संस्थामधील अधिकारी / कर्मचारी यांच्या सन २०१८- १९ च्या आर्थिक वर्षातील भविष्य निर्वाह निधीवरील व्याज प्रदानासाठी सुधारित अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार रुपये १०,१५,१३,०००/- (रुपये दहा कोटी पंधरा लाख तेरा हजार फक्त) इतकी रक्कम या शासन निर्णयाव्दारे महालेखापाल, नागपूर, महाराष्ट्र - २ यांचेकडे पुस्तकी समायोजनाव्दारे (Book Adjustment) सुपूर्द करण्यांत येत आहे.

२. वरिष्ठ कोषागार अधिकारी, अहमदनगर, रत्नागिरी, अकोला व परभणी यांनी उपरोक्त व्याजाच्या रकमेचे समायोजन करुन अभिलेखाकित करण्याची व नोंद घेण्याची कार्यवाही करण्यांत यावी.

३. कृषि विद्यापठे व त्यांच्याशी संलग्न असलेल्या संस्थेतील कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीवरील व्याज प्रदानासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात रुपये १०,१५,१३,०००/- (रुपये दहा कोटी पंधरा लाख तेरा हजार फक्त) इतकी रक्कम खाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावी.

मागणी क्रमांक - डी - १
“२०४९, व्याज प्रदाने
०३ अल्पबचत, भविष्य निर्वाह निधी इत्यादीवरील व्याज
१०४ राज्य भविष्यनिर्वाह निधींवरील, इत्यादीवरील व्याज
(००)(०१) कृषि विद्यापीठ व त्यांच्याशी संलग्न असलेल्या संस्थेतील कर्मचा-यांचा सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी (अनिवार्य) (२०४९ १२१२) भारित
४५, व्याज”

४. हे आदेश महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका (भाग-१) १९७७ मधील परिच्छेद १४२ व १६२ (अ) अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या शक्तीनुसार व वित्त विभागाने सुधारित अंदाजात मान्य केलेल्या स्पष्टीकरणास अनुसरुन मंजूर करण्यांत येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०३३०११०५५८९७०१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Gite Pratap Venkatrao

Digitally signed by Gite Pratap Venkatrao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and Animal Husbandry, Dairying and Fisheries Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fa90705dc27d17e7f5a948e535706ff2c3a1f6c3212fbe679cdac2da9677bb72, serialNumber=707437d6d784d92730d943579bec96a06c8b9d1b0f545fe42541583be9e598cd, cn=Gite Pratap Venkatrao
Date: 2019.03.30 11:28:27 +05'30'

(प्रताप व्य.गिते)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. सदस्य सचिव तथा महासंचालक / सल्लागार (वित्त), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे,
२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक,महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर,
४. कुलगरु/कुलसचिव/नियंत्रक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली, जि.रत्नागिरी,
५. कुलसचिव/नियंत्रक/ नियंत्रक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, जि.अकोला,
६. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, जि.परभणी,
७. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
८. महालेखापाल (स्थानिक निहाय लेखा परीक्षा व लेखा), महाराष्ट्र, मुंबई,
९. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर/उपकोषागार अधिकारी, राहूरी, जि.अहमदनगर,
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी/उपकोषागार अधिकारी, दापोली, जि.रत्नागिरी,
११.जिल्हा कोषागार अधिकारी, अकोला/उपकोषागार अधिकारी, अकोला, जि.अकोला,
१२.जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी/उपकोषागार अधिकारी, परभणी, जि.परभणी,
१३.उपविभागीय कृषि अधिकारी, अहमदनगर/दापोली/अकोला/परभणी,
१४.संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१५.सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे,
१६.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
१७.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
१८. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
१९.उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ) स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
२०.वित्त विभाग (व्यय-१/अर्थसंकल्प-२/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
२१.कक्ष अधिकारी, कार्यासन २अे/६अे/ पदुम-१६, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
२२.कार्यासन ७-अे (निवडनस्ती), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.